# प्रभुतरुण

| वर्ष ८९ | अंक ७ | मुंबई | फेब्रुवारी २०१३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## भाषा

**—सुहासिनी कीर्तिकर**

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन वाजतगाजत साजरे झाले. हवे, नको असणारे सगळे वाद गाजले. ग्रंथदिंडी गाजली. पण शेवटी अत्युत्तम अशी निघाली. तीन दिवसांच्या या सोहळ्यात एका परिसंवादात श्री. महेश कोठारे यांचा अन् एका रंगारंग कार्यक्रमात आदिनाथ कोठारे यांचा आणि दुसऱ्या एका परिसंवादात माझाही सहभाग होता. त्याबद्दल विशेषत्वाने इथं सांगत नाही. (कारण तो या लेखाचा उद्देशच नाही.) सांगायचं आहे विशेष म्हणजे याच संमेलनात एक परिसंवाद होता- 'आमच्या रेषा बोलतात भाषा' नावाचा. त्यात शि. द. फडणीस, विकास सबनीस, रवीमुकूल, वसंत सरवटे आदींचा सहभाग होता. त्याचंही विशेष नाही! त्यात एक नागपूरचे डॉ. चंद्रकांत चन्ने नावाचे चित्रकार होते. त्यात त्यांनी जे सांगितले; त्यांनी जो उपक्रम राबवलाय्... त्याबद्दल विशेष सांगायचंय. ते जे. जे. स्कूलचे पदवीधर. नागपूरच्या कमर्शियल आर्टस् कॉलेजचे प्राचार्य. पण या व्यतिरिक्त स्वत:च्या एका छोट्या जागेत ते छोट्यांसाठी कलादालन चालवतायत्. फक्त शंभर मुलांचे. या मुलांचं वय पाच ते पंधरा या गटातलं. केवळ स्वत:च्या छंदासाठी ते या मुलांचा छंद जपताहेत. केवळ स्वत: हाडाचे शिक्षक म्हणून या मुलांना शिक्षणाची वेगळी मुक्त वाट करून देताहेत. या शाळेत ते स्वत: शिकवत काहीच नाहीत. फक्त या मुलांचे 'अरे बाबा' होऊन वावरतात. त्यांच्या कल्पनेला पंख देतात. हे पंख छाटू पाहणाऱ्या झापडबंद पालकांचे तथाकथित 'कर्तव्या'चे पंख कापतात अन् मुलांच्या हातातील रेषांना कलेचा आकार मिळण्यासाठी त्यांना मुक्त स्वातंत्र्य देतात.

यातून त्यांना आलेले अनुभव त्यांनी इतक्या जिव्हाळ्याने अन् भरभरून सांगितले की, 'बालकपालक' नाते त्यातून उलगडत गेले. त्यातले एकदोन अनुभव, प्रसंग सांगायचा मोह होतोय. एका सात वर्षाच्या मुलानं रेघारेघांचा पिंजरा काढला. त्या पिंजऱ्यात त्याचा राघू बसला होता. हिरवे पंख, निळी भली लांब शेपूट, पिवळे पोट, काळी मान, लालेलाल चोच. पण तो राघू त्या मुलाचा खास असल्याने पिंजऱ्याला महत्त्व नव्हतेच. त्या पिंजऱ्याच्या तारा वाकवून, फोडून तोडून जणू तो पिंजऱ्याबाहेर डोकावत होता. त्याची मान, डोळे, चोच तर आकाशाला भिडली होती. या 'बाबा'नं मुलाला शाबासकी दिली. दुसऱ्या दिवशी त्याचा खरा बाबा आला चन्नेसरांकडे. ''हे काय चित्र आहे?''

सर म्हणाले, ''हो. छान आहे की.''

''अहो काहीतरीच काय? असा पिंजऱ्याबाहेर असणारा 'पिंजऱ्यातला पोपट'? उडून जाईल तो अशानं. माझ्या मुलाला जरा वास्तवाचे भान देत जा की.''

चन्ने म्हणाले, '' असा कसा उडून जाईल तो? तो काय झाडावरचा आपल्या जगातला पोपट आहे का? तो नाही उडून जाणार.'' मग चन्नेसर आम्हा श्रोत्यांना म्हणाले की निसर्गावर प्रेम करीत कल्पनेतले वास्तव जर चित्रात उतरले तर त्याच्या आकाररेषा कलाकाराच्या मनातल्या चित्राकार्याच्या रेषा असतात. त्यालाच आईबाबांनी फुलत्या वयात खतपाणी घातले पाहिजे. कलाकार एखाद्या रूपगर्वितेच्या चित्रात तिचे ओठच अधिक विशाल, ठळक, वेधक करतो तेव्हा त्याच्या मनातील रूपगर्वितेचे कामुकपण त्या ओठात त्याला भरायचे असते. प्रत्यक्षात अशी स्त्री बेरूप वाटण्याचीच शक्यता!। मग घडत्या वयात या कल्पनेला बांध कशाला घालायचे?

कल्पनेला बांध न घालण्याच्या या 'बाबा'च्या धोरणाने कल्पकता किती बहरते; त्याचं आणखी एक उदाहरण.

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## चष्मेबहाद्दूर

**-मिनाक्षी जयकर**

माझी एक जुनी मैत्रीण खूप दिवसांनी परवा मला भेटली. साहजिकच जुन्या स्मृतींना उजाळा मिळाला. बोलता बोलता तिच्या चष्म्याचा विषय निघाला. तिचा चष्मा हा आम्हा मित्रमंडळीत नेहमीच चेष्टेचा विषय होता. ही पठ्ठीपण सर्वांना पुरून उरत असे. आम्ही चिडवतो म्हणून ती कधी चिडत नसे वा मनावर घेत नसे. त्यामुळे आम्हीही तिला थट्टेत काहीही बोलत असू. त्यावेळी तिने सांगितलेली एक आठवण जागी झाली. ही साधारण तीस-पस्तीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. माझ्या मैत्रिणीला वयाच्या सातव्या-आठव्या वर्षीच चष्मा लागला. तेव्हा चष्मा लागणे आणि तोही मुलीला; ही फार मोठी गोष्ट होती. सामान्यत:च चष्मा लागणं हे कमीपणाचं समजलं जाई. आजच्या कॉम्प्युटर, मोबाईलच्या जमान्यात चष्मा असणं ही सर्वांनी सहज स्वीकारलेली गोष्ट झाली आहे. ''खूप वेळ कॉम्प्युटरवर बसते/तो, चष्मा लागला तर नवल काय?'' असं म्हणून वस्तुस्थिती स्वीकारली जाते. पण पस्तीस वर्षांपूर्वीचा काळ असा नव्हता. माझी मैत्रीण तिच्या आईबरोबर डोळ्यांच्या डॉक्टरकडे डोळे तपासायला गेली होती. डॉक्टरने चष्मा लागल्याचे निदान केल्यावर डॉक्टरसमोर तिची आई तिला काहीच बोलली नाही. पण तिथून बाहेर पडताक्षणीच आईच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला, ''माझ्याच मुलीला चष्मा लागायचा होता! आधीच नकटी, त्यात चष्मा लागला. आता हिचं लग्न कसं होणार? कोण हिला पत्करणार?'' याचा व्हायचा तोच परिणाम झाला. तिच्या कोवळ्या मनावर दोन गोष्टी कायमच्या ठसल्या. एक म्हणजे चष्मा लागणे ही चांगली गोष्ट नाही आणि दुसरी म्हणजे चष्मा लावून ती सुंदर दिसत नाही. म्हणून ती शक्यतो चष्मा लावणे टाळायची. मग व्हायचं काय की तिला सगळं धूसर दिसत असे. एखादी गोष्ट अगदी जवळ गेल्याशिवाय तिला स्पष्ट दिसत नसे. त्यामुळे कितीदातरी खूप मजेशीर प्रसंग उद्भवले आहेत. अगदीच राहवत नाही म्हणून एक प्रसंग इथे सांगते. एकदा ही माझी मैत्रीण एका बँकेत काही कामानिमित्त गेली होती. अर्थात् नेहमीप्रमाणे चष्मा लावला नव्हताच. बँकेतलं काम आटपून ती परत घरी जायला निघाली तसं तिला राहवलं नाही. बँकेत गेल्यापासून ती बघत होती, एक माणूस सारखा तिच्याकडे पाहून ''ब्रॉड स्माईल'' देत होता. तो माणूस एवढं ओळखीचं हसत होता पण हिला मात्र तो कोण असावा हे लक्षात येत नव्हतं. क्षणभर तिला भीतीही वाटली, हा कोणी आपल्यावर 'लाईन' तर मारत नाही? डोळ्यावर चष्मा नव्हता म्हणून तो माणूस तिला नीट दिसत नव्हता. शेवटी बँकेच्या दरवाज्यापर्यंत गेलेली ती माघारी फिरली आणि त्या ओळख पटेल या हेतूने! ही त्याची माणसाकडे जात असतानाही त्याच्या चेहऱ्यावरचे हसू तसूभरही कमी झालं नव्हतं. याचं रहस्य तिला जवळ गेल्यावर समजलं. तो खरा माणूस नव्हताच मुळी! तो कपिलदेवचा पुरुषभर उंचीचा कटआऊट होता! बऱ्याच वर्षांनी तिच्या या अचानक भेटण्याने जुन्या आठवणी परत चाळवल्या गेल्या.

चष्मा हा केवळ शारीरिक दृष्टी देणाराच असतो असं नाही! त्याला एक सम्यक दृष्टीही असू शकते. त्याचं ताजं उदाहरण म्हणजे ॲड. नीलिमा कानेटकर यांच्या नुकत्याच आलेल्या पुस्तकाचं मुखपृष्ठ. ''अखेर न्याय मिळाला!'' या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर तीन जाडी कायद्याची पुस्तके व न्यायाधीशांचा हातोडा दाखवला आहे आणि त्या कायद्याच्या पुस्तकावर विराजमान आहे एक चष्मा!

इतकंच कशाला; एक विशिष्ट तऱ्हेचा चष्मा चित्रात काढला की शेंबडं पोरंगसुद्धा ओळखतं, ''अरे! हा तर बापूजींचा चष्मा!'' एक काठी

(पान २ कॉलम ३ वर)

(पान१ कॉलम २ वरून)
याच शाळेत रामायणावर चित्रं काढायची होती. एका दुसरीतल्या विद्यार्थ्यानं रावणाचं चित्र काढलं. कसं? दहा तोंडी रावण होता तो. पण ही तोंडं पसरलेली, आडव्या रेषेतली नव्हती; तर मडक्यांची उतरंड असावी तशी एकावर एक गोल दुसरं तोंड, त्याच्या केसांवर चपखल तिसरं गोल तोंड, त्याच्यावर चौथं, त्याच्यावर पाचवं असं पार छतापर्यंत गेलेले दहावे तोंड. एका सरळ उभ्या रेषेत वीस डोळे, दहा नाके, दहा तोंडं! त्या मुलाची आई आली तणतणत.

''सरभौ, याला काऊन शाबासकी दिली तुमी?''

''बाई, छाऽऽन रावण काढलाय् यानं. कसा इतरांपेक्षा वेगळा आहे. अहो बाई, सरळ आडव्या रेषेत दहा तोंडं कोणी काढली? चित्रकारानंच नं? आपण प्रत्यक्षात पाह्यलीत का ती?''

बाई गुमान घरी गेल्या. मग 'बाबा'नं त्या मुलाला विचारलं की 'असं चित्र काढावसं तुला का वाटलं?' त्या मुलानं सांगितलं की, गोष्ट सांगताना त्याची आजी सांगते की, 'रावण एकापेक्षा एक वाईट होता-' म्हणजे या मुलानं त्याच्या मनातलं 'एकापेक्षा एक' या रीतीनं व्यक्त केलं होतं.

या परिसंवादात 'आमच्या रेषा' बरोबरच मुलांच्या रेषा कशी आणि कुठली भाषा बोलतात हे चन्नेसरांनी फार छान सांगितलं. मजा आली.

मुलांची 'भाषा' सांगणारी माझी (म्हणजे मी लिहिलेली) एक गोष्ट इथं देणं प्रस्तुत होईल. ती गोष्ट अशी-

कथेचं नाव आहे संस्कार.

दिवाळीची महिनाभर सुट्टी. शाळेच्या परीक्षा आटोपलेल्या. मुलं अख्खा दिवसभर धुडगूस घालणार. नाहीतर टी.व्ही. समोर ठाण मांडून बसणार. झालं. सुरभीला घरातल्या 'आई'ची काळजी वाटू लागली. म्हणा; तशी काशीबाई असते त्यांच्या मदतीला. पण एरवी आरित अन् अवनीच्या मागे शाळा संपली की होमवर्क असतं. संध्याकाळी एका तासासाठी म्युझिकटीचर येतात. यावेळी म्युझिकटीचरनीही पंधरा दिवस गावी जाण्यासाठी सुट्टी घेतली होती. म्हणजे आता होमवर्क नाही, म्युझिकक्लास नाही. बरं आपणही ऑफिसमधून सुट्टी घ्यावी तर तिच्या ऑफिसमध्ये त्याच सुमाराला कॉन्फरन्स होती. परदेशचं पॅनल येणार होतं. आरित, अवनीचे बाबा गेले होते टूरला. मोठाच प्रश्न पडला. ऑफिसला जाताना टी.व्ही. लॉक करावा म्हटलं तर मुलांनी तरी दिवसभर करायचं काय? कॉम्प्युटर, नाहीतर टी.व्ही.! मोबाईलवर गप्पा फार फार तर. 'केबीसी' वर असतात तसे एवढेच ऑप्शन्स्! आरित, अवनी ज्या सोसायटीत रहात होती तिथे त्यांच्या वयाचे तसे फार सवंगडीही नव्हते की बाबा; चला आता व्यापार खेळू. पत्ते कुटू. सुरभीला स्वत:चं बालपण आठवलं. घरीदारी मुलंच मुलं. कधी असा प्रश्न पडला नाही कुणाला; की आता वेळ कसा काढायचा? दिवाळीचा फराळ करायला घाणे पडत. लुडबूड करता येई तिथे. किल्ले केले जात. आकाश कंदिल, रांगोळ्या, वाळवणं, भेटकार्ड बनवणं अन् काय काय! तिचे एक काका तर फटाक्याची दारुही घरी बनवीत. मग त्यांना मदत करणं असे. आताशा घरी फराळ तयार करणे नाही. वेळ आहे कुणाला? आकाश कंदिल, किल्ले करणे याला इतर मुलांची साथ लागते. त्याचीच वानवा. मुलांनी करायचं काय? राहून राहून हाच प्रश्न परत परत ट्विट होत राहिला तिच्या मनात. त्या पाठोपाठ आणखी एक भयाण प्रश्न... मुलांवर संस्कार होणार कसे?

सुरभी ऑफिसला जायला कारमध्ये बसताबसता तिचा मोबाईल वाजला. श्रेया होती फोनवर. मनातल्या प्रश्नांचीच देवाणघेवाण झाली. श्रेयानं सुट्टीत हॅण्डीक्राफ्टचा क्लास घरच्या घरी सुरू केला होता. आठवडाभराचा. सुटल्यासारखं वाटलं सुरभीला. चऽऽला. एक हजारात एक आठवडा चिंता गायब! आरित, अवनी श्रेयाआंटीकडे जाऊ लागली. तिथं आणखी आठ मुलं होतीच. मज्जा आली. भेटकार्ड बनव, टिकल्या-टिचक्या लावून कार्डबोर्डचं वॉलहँगिंग बनव, ताटाभोवतीचं रंगीत कागदाचं नक्षीदार डिझाईन कोतरून तयार कर. कारमध्ये टांगायसाठी लोकरीच्या तुकड्यांची भावली बनव... यात मुलं रंगून गेली. सासूबाईंना आता दिवसभर त्रास नाही म्हणून सुरभीलाही सुटल्यासारखं वाटलं. मात्र मनातला प्रश्न तसाच राहिला... मुलांवर संस्कार होणार कसे?

पण आठवडा संपता संपता त्याचंही उत्तर मिळालं की. श्रेयाआंटीनं पिवळा आईसक्रीम स्टिक्सचा पिंजरा शिकवला. त्यात हिरवा हिरवा कार्डबोर्डचा पोपट. त्याला वर एक काठी. ती फिरवली की तो पोपट पिंजऱ्यात वरखाली उड्या मारल्यासारखा नाचे. गंमत आली मुलांना. घरीही या सगळ्या गंमतीचं कौतुकच झालं. आल्या गेल्या पाहुण्यांना या वस्तुंचं प्रदर्शन होई ते वेगळंच. त्या दिवशी आरितची मावशी आली होती घरी. बँक हॉलिडे होता ना! नेहमीप्रमाणे भावली, वॉलहँगिंग, काचांचं भेटकार्ड... असं प्रदर्शन झालं. पण 'अरे! तो पिंजऱ्यातला पोपट कुठे रे आरू?' आजीनं विचारलं. तर अवनी म्हणाली, 'अग, त्यानं तो गच्चीत दोरी बांधून उडवला आकाशात.' सगळेच चकीत झाले. 'हो मग? त्याला पिंजऱ्यात कशाला कोंडून ठेवायचा? मी त्याला दोरी बांधली अन् दिला आकाशात सोडून!'- आरुचं हे उत्तर ऐकून सुरभीनं त्याला पोटाशीच घेतला.

'गुणी बाळ ते माझं!' ती म्हणाली.

*

(पान१ कॉलम ४ वरून)
आणि तो विशिष्ट चष्मा म्हणजे बापूजी हे समीकरणच बनून गेलं आहे. कुठे पूर्वीचा पंतोजींचा चष्मा आणि आजकाल आपण जास्ती स्मार्ट दिसावं म्हणून लावतात तोही चष्माच! तारकनाथचा 'उल्टा चष्मा'ही तोच. या सगळ्या चष्म्यांना कोणाची नजर न लागो, चष्मेबहाद्दूर!

## पाठारे प्रभु महिला समाज

रविवार दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजी पाठारे प्रभु महिला समाजातर्फे आनंद मेळावा पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात खार येथे आयोजित केला होता.

या आनंद मेळाव्याचे उद्घाटन सुप्रसिद्ध गायिका सारेगम फेम अपूर्वा गज्जला यांच्या हस्ते झाले.

एकूण ७० स्टॉल्स अकर्षकरित्या सजविले होते. यामध्ये पर्सेस, हँडबॅग्ज, १ ग्रॅम सोम्याचे दागिने, मोत्याचे दागिने, आर्टिफिशियल ज्वेलरी, साड्या, गाऊन्स, ड्रेस मटेरियल्स, आयुर्वेदिक औषधे, परभी घडा, चुरमा लाडू, केक्स, चॉकलेट, पाय, सूप, लोणची, मसाले, पंचामृत, खिम्याची कवठे, बिर्याणी, कलिंगडचा रस, पाणीपुरी, शेवपुरी, कोलंबीचे पॅटीस, चिकन रोल, खरवस, कोंबडी वडे, सोलकढी, पंगोजी, लहान मुलांचे कपडे, ज्वेलरी बॉक्स, टेरोकार्डचाही स्टॉल होता.

सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत लोकांनी गर्दी करून या भव्य आनंद मेळाव्याचा आनंद लुटला.

*

शनिवार दिनांक १९ जानेवारी २०१३ रोजी दुपारी ४ वाजता सुरेश विठ्ठल हॉल, ठाकुरद्वार येथे घडापार्टी आयोजित केली होती. त्यादिवशी कलाकौशल्य स्पर्धा, फॅब्रिक पेंटींग स्पर्धा व सामान्यज्ञान स्पर्धा घेण्यात आल्या.

**कलाकौशल्य स्पर्धा**

विषय:- ताज्या फुलांचे तोरण करणे.
*प्रथम क्रमांक*- सौ. स्वप्ना विनित जयकर, *द्वितीय क्रमांक*- श्रीमती सुरूपा राणे देवरूखकर, *तृतीय क्रमांक*- श्रीमती हेमा रामचंद्र जयकर

**फॅब्रिक पेंटिंग**

विषय:- ८ X ८ मापाच्या चौकोनात सूर्यफूल काढून रंगविणे
*प्रथम क्रमांक*- सौ. विद्या विजय त्रिलोकेकर, *द्वितीय क्रमांक*- श्रीमती श्रीमती हेमा रामचंद्र जयकर, *तृतीय क्रमांक*- सुरूपा राणे देवरूखकर

सामान्य ज्ञान

विषय:- दिलेले पर्याय निवडून प्रश्नांची अचूक उत्तरे लिहिणे

वयोगट १० ते १५ मध्ये कु. श्रद्धा दीपक धराधर ही एकच स्पर्धक असल्यामुळे तिला समाजाचे बक्षीस दिले गेले.

वरील स्पर्धेचे परीक्षण सौ. शिल्पा जयंत कदम यांनी केले.

## अभिनंदन

❁ डॉ. सुमन नवलकर यांच्या 'अक्कण माती' संग्रहास मुंबई मराठी साहित्य संघाचा कै. मिलिंद गाडगीळ बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला. निवड समितीत सुहासिनी कीर्तिकर एक परीक्षक सदस्या होत्या.

❁ श्री. प्रकाश खरात यांच्या साठीनिमित्त पार्थिव-अपार्थिव कवितासंग्रहाचे पुनर्प्रकाशन झाले. या पुस्तकावर सुहासिनी कीर्तिकर बोलल्या. याच निमित्ताने झालेल्या कविसंमेलनात डॉ. सुमन नवलकरांचा सहभाग होता.

❁ २ फेब्रुवारी रोजी मुंबई मराठी साहित्य संघातर्फे महानगर मराठी साहित्य संमेलन देखणेपणाने पार पडले. या संमेलनाचे आयोजन, प्रास्ताविक, सूत्रसंचालन सुहासिनी कीर्तिकरांनी केले. यावेळी झालेल्या कविसंमेलनातही डॉ. सुमन नवलकरांचा सहभाग होता.

❁ डॉ. कुमुद कानिटकर यांनी मातृपूजेवर आधारित संस्कृती आणि कला यावर शोधनिबंध सादर केला. यासाठी पिठोरीबद्दल माहिती आणि आकृती/चित्रे संदर्भात प्रा. सुहासिनी कीर्तिकर, सौ. जान्हवी नील कीर्तिकर. सौ. शोभना उदय जयकर, श्री. राजन जयकर, सौ. सुजाता तुषार कीर्तिकर, श्री. प्रताप वेलकर, सौ. लता कुमार त्रिलोकेकर यांचे सहकार्य लाभले. हा शोधनिबंध सादर होताना कोलकत्यास प्रा. अनिता कोठारेही उपस्थित होत्या. प्रताप वेलकर यांचे पुस्तक आणि प्रा. व्ही. डी. राव यांचा प्रबंध संदर्भासाठी वापरला गेला.

❁ आमच्या सदरलेखिका आणि कुटुंब न्यायालयाच्या माजी न्यायाधीश सौ. बागेश्री परीख यांच्या चित्रांचे प्रदर्शन २६ जानेवारी रोजी पार्ल्याच्या सी. के. पी. सभागृहात भरले होते. गौतम बुद्ध आदींची तैलचित्रे आणि त्यांनी काढलेल्या रांगोळ्यांची छायाचित्रे, विवेकानंदांची रांगोळी प्रत्यक्षात मांडली होती. त्यांनी घडविलेल्या विविध गणेशमूर्ती प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या. चाकूने काढलेली वाराणसी घाटाची रंगाकृती लक्षवेधक होती. प्रदर्शनाला भरघोस प्रतिसाद मिळाला. आंतरविश्वात प्रसिद्ध असलेले चित्रकार श्री. शिरवाडकर आवर्जून उपस्थित होते.

❁ आयबीएन चॅनेलवर श्री. नंदू अरविंद धुरंधर यांच्या 'सितारे' कॅलेंडरबाबत अनेक 'सेलिब्रेटीज' भरभरून बोलले. सचिन पिळगांवकर, मृणाल कुलकर्णी, संतोष जुवेकर आदी अनेकांचा त्यात सहभाग होता. आधीच्या दोन दिनदर्शिकांप्रमाणे २०१३च्या 'सेलिब्रेटीज कॅलेंडर'ला भरघोस प्रतिसाद मिळो.

श्री. नंदकुमार यांचे अभिनंदन.

लेखांक-२

## फुलता नलिनी दल

# सर्वात्मका सर्वेश्वरा

— नलिनी तळपदे

परमेश्वरा, तू सर्वसाक्षी, सर्वज्ञानी आहेस. निराकार, निर्गुण आहेस. अनंतकोटी ब्रह्मांडनायक आहेस. इतकंच नाही तर; अवघं विश्व व्यापून तू दशांमुळे वर उरला आहेस. तू या विश्वाचा निर्माता, जगन्नियंता आहेस.

लहानपणापासून तुझ्याविषयी आम्ही हेच ऐकत आलो. कोणत्याही शुभकार्याचा आरंभ गणपतीपूजनाने होतो. तसंच मंगलकार्याच्या पत्रिकेवरही 'श्री' कृपेकरून असंच लिहिलं जातं. याचाच अर्थ देव या संकल्पनेवर आमचा पूर्ण- नव्हे दृढ विश्वास आहे. तुझं अस्तित्व आम्ही कधीच अमान्य केलं नाही. करणारही नाही.

भक्तीभावाने म्हणा किंवा संकट निवारण्यासाठी म्हणा, तुला मानणारे हजारोंच्या संख्येने असतांना मूठभर लोकांनी तुझ्या अस्तित्वाविषयी केलेल्या चिकित्सेनी इतका विचलीत, भ्रांतचित्त होऊ नकोस देवा. तुला तर माहीत आहे की हे कलीयुग आहे. शिवाय ही लोकशाही आहे. लोकशाहीत प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे. असा मतामतांचा गलबला नेहमीच होतो. आज ही वेळ तुझ्यावर आली आहे एवढंच.

तसंही हे युग विज्ञानाचं आहे. इथे प्रत्येक गोष्ट वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिली जाते. लोकांचा भ्रमनिरास व्हावा हा त्यामागचा उद्देश असतो. आता हेच पहा ना- 'देवसखा की बागुलबुवा' या शीर्षकाच्या लेखातून लेखिकेने आपले मौलिक विचार मांडून देव या संकल्पनेलाच छेद दिला आहे.

त्यांच्या मताशी सहमत न होता त्यांच्या स्पष्टोक्तीला दाद देऊन मी एवढंच म्हणेन, देवाला सर्व ठिकाणी जाणं शक्य नसल्यामुळे त्याने आईला आपलं उत्तरदायित्व दिलं. आम्ही मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। अतिथी देवो भव। असं म्हणून त्यांना यथाशक्ती मान देतो. आम्हाला ते देवतातुल्य आहेत असं मानतो. इथेच देवाचं अस्तित्व सिद्ध होत नाही का? दिवेलागणी झाली की देवापुढे 'शुभंकरोती' म्हणून देवाला मनोभावे नमस्कार करण्याची शिकवण विशेषत: लहान मुलांना बऱ्याच कुटुंबातून दिली जाते. आम्हीही हेच शिकत मोठे झालो. आम्हाला बागुलबुवाची भीती कधीच दाखवली गेली नाही. उलट दंगामस्ती केली तर हे देवबाप्पाला आवडणार नाही हं. तो वरून सगळं बघतो असं सांगितलं जायचं.

तेहतीस कोटी देवांची कल्पना अवास्तव आणि अतिरंजित असली तरी ब्रह्मा, विष्णू, महेश ही उत्पत्ती, स्थिती, लय यांची प्रतिकात्मक रूपं आहेत हे मानावंच लागेल.

आम्ही चंद्रावर गेलो. मंगळावर गेलो. वेगवेगळ्या मार्गांनी या विश्वाच्या निर्मितीचं कोडं उलगडण्याचा प्रयत्न करतो आहोत. नुकताच शास्त्रज्ञांना संशोधनातून एक विश्वाच्या उत्पत्तीचा शोध लावणारा कण सापडला, त्याचं नाव त्यांनी 'देवकण' असंच ठेवलं आहे. हा विश्वाचा डोलारा, त्यातील चंद्र, सूर्य, ग्रहताऱ्यांच्या येरझारा, सहा ऋतूंचा फेरा- कोण आहे या मागचा सूत्रधार परमेश्वरा-? तूच ना.

आम्हाला लहानपणी 'देव न मानणारा देवमाणूस' हा गोपाळ गणेश आगरकरांचा धडा होता. त्यांनी स्त्रियांच्या सुधारणेचं कार्य हाती घेतलं होतं. 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हति'चे हे मनुस्मृतीतील वचन मोडीत काढून 'यत्र नार्यस्तू पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' ही भावना समाजमनात रूजवण्याचा प्रयत्न केला. हेच महत्कार्य महर्षि कर्वे व महात्मा फुले यांनीही केलं. समाजसुधारणेचा वसा घेतलेल्या या त्रिमूर्तीकडून हे महत्कार्य कर्त्याकरवित्यानी म्हणजे तूच करवून घेतलं असशील ना?

आजही काही अतिसुधारक घरात देव नसल्यामुळे देवपूजा करण्याचा किंवा तिन्हीसांजेला देवापुढे दिवा लावण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. पण संकटाच्या वेळी ही माणसं मनातल्या मनात नक्कीच तुझा धावा करत असतील. तुला साकडं घालत असतील.

देवा, काही वर्षांपूर्वी बाबरी मशीद आणि राम मंदिरावरून रणकंदन झालं ते तुझ्याचमुळे ना? त्यामुळे तर तुझं अस्तित्व पुन्हा निर्विवाद सिद्ध झालं. तरी एका गोष्टीचं राहून राहून आश्चर्य वाटतं. तुझ्या दर्शनाला जाताना किंवा परत येताना कित्येकदा जे भीषण अपघात घडून माणसं मृत्यूमुखी पडतात तेव्हा हे दयाघना तू कुठे असतोस? मोठ्या भक्तीभावाने तुझ्या दर्शनासाठी आसुसलेल्या त्या निरपराध भाविकांचा असा घात करून तू त्यांचा आणि त्यांनी तुझ्यावर टाकलेल्या विश्वासाचाही घात करतोस असं नाही का तुला वाटत? शुभ मुहूर्त साधून, तुझी साग्रसंगीत पूजाअर्चा करून निघालेल्या लग्नाच्या वऱ्हाडाचीही तीच गत.

इतका कसा निष्ठूर होऊ शकतोस तू करुणाकरा? देवाज्ञेशिवाय यमाचे पाश कुणाभोवती कसे आवळू शकतील? हेच त्यांचं प्राक्तन होतं असं म्हणायचंय का तुला? कदाचित् त्यांच्या मोक्षप्राप्तीचा विचार तू का केला असावास, शेवटी ईश्वरा तुझी लीला अगाध आहे हेच खरं! काही का असेना- तू आहेस म्हणून माणसं थोडीतरी पापभीरु बनली आहेत. पापपुण्य, नीतिअनिती, बरंवाईट या कल्पना त्यांच्या मनात रूजल्या आहेत.

आपल्या महाराष्ट्रात संतांची मोठी परंपरा आहे. या संतमंडळींचा तर देवा तू सखा, सोबती होतास. भक्तांचा भाव पाहून त्यांच्यात रमणारा, प्रसंगी त्यांच्यासाठी श्रमणारा. ही पुराणातली वांगी पुराणात ठेवू म्हटलं तरी शिवाजी महाराजांना भवानी तलवार देणारी भवानी देवीच होती. मराठ्यांच्या इतिहासाची याला साक्ष आहे.

अष्टविनायक, बारा ज्योतिर्लिंग, ३।। शक्तीपीठ, मुस्लिमांच्या मशिदी, दर्गे, शीखांचे गुरुद्वारा, ख्रिश्चन लोकांचे चर्च, पारश्यांच्या अग्यारी ही प्रत्येक जातीधर्माची श्रद्धास्थानेच आहेत.

श्रद्धा ही निखळ असावी. अंधश्रद्धा नसावी. विश्वासही डोळस हवा. तो कुणावरही चटकन् ठेवू नये किंवा अविचाराने अविश्वासही दाखवू नये. अलीकडे या दोन्ही मूल्यांचा ऱ्हास होत चालला आहे. अर्थात याला काही अंशी परिस्थिती कारणीभूत आहे. जनतेचा सरकारवरचा विश्वास उडत चालला आहे. निवडणुकीपुरतं जनतेशी नातं जुळवू पाहणारं सरकार जनतेचं कधीच नव्हतं. हे वारंवार सिद्ध झालं आहे. जनतेच्या पैशावर मोठमोठे घोटाळे करून नामानिराळे होऊ पाहणारे भ्रष्टाचारी नीडर शासनकर्ते. त्यांना ना चाड नीतीची, ना लाज जनाची वा मनाची. जो तो आपलं उखळ पांढरं करण्याच्या प्रयत्नात.

खरंच कळत नाही देवा. कुठं चाललंय हे जग? ही विनाशकाले विपरीत बुद्धी तर नाही ना?

नीतिअनितीची, देवाधर्माची बूज न राखणाऱ्या, किंबहुना देवाचं देवत्व न मानता स्वत:च्या कर्तृत्वावर आम्ही हवं ते करू शकतो अशी प्रौढी मिरवणाऱ्यांनी पायाखालची जमीनही सरकू शकते. आभाळही फाटू शकतं हे लक्षात ठेवून, आमच्यासारखे आम्हीच या भ्रमात राहू नये. देवा आता तूच सांग, तुझ्यापुढं नवस करण्यासाठी व फेडण्यासाठी लागलेल्या रांगा, अडीअडचणीच्या वेळी धावून येणाऱ्या व्यक्तीला उद्देशून अगदी देवासारखा आलास हे सहजोद्गार, इतकंच नव्हे तर ज्यांना आपण परमेश्वरासमान मानतो त्या डॉक्टरांची परमेश्वरावर असलेली प्रगाढ श्रद्धा. तू बागुलबुवा नसून आमचा सखा आहेस हेच सिद्ध करत नाही का?

देवा, आज या घडीला आम्हाला खरोखर तुझी गरज आहे. अंतराळाचा वेध घेणाऱ्या मूठभर लोकांपेक्षा रसातळाला जाणाऱ्यांची संख्या जास्त आहे. तूच आम्हाला या गर्तेतून बाहेर काढू शकतील.

हे सर्वात्मका सर्वेश्वरा, शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या तुला या विश्वाचा विस्कटलेला डाव पुन्हा नव्यानं मांडणं अशक्य तर नाही ना? नाही रे, तू बागुलबुवा नाहीस. तू आमचा सखा पाठीराखाच आहेस.

*

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



# युवामंच

## एक सुनियोजित नेत्रदिपक सोहळा



दि. २५ जानेवारी रोजी इस्कॉन ऑडिटोरियम, जुहू येथे एक शानदार सोहळा पार पडला. निमित्त होते, कु. निहारिका कोठारे या तेरा वर्षीय मुलीच्या आरंगेत्रम्‌चे!

पाच वर्षांची असल्यापासून नृत्यसाधना करणारी निहारिका ही निहाल व अर्चना कोठारे, (खार) यांची कन्या असून श्री. जयपाल व विद्या कोठारे यांची नात आहे. भरतनाट्यम् या शास्त्रीय नृत्यप्रकाराच्या सातही परीक्षा तिने यशस्वीरित्या म्हणजे 'ए' ग्रेड मिळवून पार केलेल्या आहेत. हा निहारिकाचा पहिला कार्यक्रम होता. या उत्तम आरंगेत्रम्‌चे निवेदन श्री. प्रदीप भिडे यांनी केल्याने कार्यक्रमास अधिकच लज्जत आली.

गणपती, शिव आदी देवतांना आवाहन करीत निहारिकाने अल्लारिफ, जतिस्वरम्, शब्दम्, वर्णन हे पारंपारिक नृत्यप्रकार एकामागोमाग दीड तास लीलया सादर केले. यानंतरच्या थालीनृत्याने तिने प्रेक्षकांची मने जिंकली. मध्यंतरानंतर नटनम्, तिल्लाना या कठीण शास्त्रीय नृत्यानंतर तिने सिनेसंगीतावर आधारित उपशास्त्रीय नृत्ये सादर करून बहार उडवून दिली. ताल, लय, अभिनय यातील तिचे प्राविण्य कौतुकास्पद होते. तिचे गुरुजन, घरातील वडील मंडळी व आमंत्रित नातेवाईक, मित्रमैत्रिणी आशीर्वाद देण्यास हजर होते. सर्व गुरू, वादक, वडील मंडळी, निवेदक, छायाचित्रकार, रंगमंचव्यवस्थापक, इस्कॉन व्यवस्थापक यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. एकत्र कुटुंबपद्धतीचे उत्तम उदाहरण असलेल्या कोठारे कुटुंबीयांनी कार्यक्रमानंतर सर्वांना उत्कृष्ट भोजन देऊन तृप्त केले.

निहारिकास पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा!

### घरटे

इएमआयच्या काटक्यांनी
घरटी बांधली
घरट्यांमध्ये एकदोन पिले घातली
चारापाणी देऊन देऊन
खूप मोठी केली
पंख फुटले
पिले उडाली
देशोदेशी जाऊन वसली
काही पिल्ले परत फिरली
आपल्याच देशात गावोगावी
हसत वसली
उरली पिल्ले परत येतील
वाटेकडे डोळे लावून
आस लावली
असाल तिथे खूष रहा
आपल्या संसारात दंग रहा
तुमचे सुख तेच आमचे सुख
हेच मनाला बजावत रहातो
सणासुदीला आठवण मात्र येत रहाते
दोन वर्षांनी एकदातरी गाठ पडते
उशीवर डोके टेकता
रोज मात्र आठवण येते
ईर्षा, ॲम्बीशन, मजबुरी
हे सर्व शब्द ठरतात
माया, प्रेम, लव्ह हे मात्र
कोपऱ्यात रूसतात
पंख आसुसतात
उबेमध्ये घेण्यासाठी
याल का रे परतून कधी?
की अशाच होतील
गाठीभेटी?

-रंजन खंजेराव विजयकर

### पाठारे प्रभु चॅरिटीज

दरवर्षीप्रमाणे जानेवारी २०१३ मधील जवळजवळ सत्तर पानांचे 'न्यूज लेटर' चॅरिटीजने प्रसिद्ध केले. शारदेच्या दरबारातील विद्याभूषण मानकऱ्यांचा सत्कारसोहळा, या सोहळ्याविषयीच्या काहींच्या प्रतिक्रिया, व्यंकटेश मंदिरातील घटस्थापनेचा वृत्तांत, दिवाळी उत्सव, माहेश्वरी देवीचा उत्सव आणि अर्थविषयक तपशील यात आहेच. शिवाय डॉ. विनोद धुरंधर आणि डॉ. निखील धुरंधर यांनी लिहिलेल्या पुस्तक प्रकाशनाच्या सोहळ्याचा बागेश्री परीख यांनी लिहिलेला वृत्तांत आणि कु. वैजयंती विश्वास अजिंक्य हिचे शूटिंग स्पर्धेतील घवघवीत यश यांनाही सन्मानाने प्रसिद्धी देण्यात आली आहे. 'न्यूजलेटर'चे मन:पूर्वक स्वागत.

## अखिल भारतीय मराठी व्यंगचित्रकार संमेलन २०१३

-प्रदीप कोठारे

शुक्रवार, दिनांक १ फेब्रुवारी आणि शनिवार, २ फेब्रुवारी रोजी पुण्यात बालगंधर्व रंगमंदिरात अखिल भारतीय मराठी व्यंगचित्रकार संमेलन भरले होते. सरस्वती वाचनालय आणि कार्टुनिस्ट कम्बाईनतर्फे भरवले गेलेले हे संमेलन दिमाखात साजरे झाले. जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीला हे संमेलन अर्पण करण्यात आले होते, हे औचित्यपूर्णच. या निमित्ताने मराठी व्यंगचित्रकारांची जणू एक जत्राच भरली होती. त्या जत्रेतला मी एक व्यंगचित्रकार. किती आत्मसन्मान वाटला मला!

सायंकाळी पहिल्या दिवशी मंचावर आमचा परमेश्वर साक्षात प्रमुख पाहुणा म्हणून अवतरला- 'दी अनकॉमन मॅन'... आर. के. लक्ष्मण! उद्घाटक होते व्यंगचित्रकार श्री. राज ठाकरे. त्यांनी स्टेजवर बाळासाहेबांचे अर्कचित्र काढून उद्घाटन केले. तब्येत ठीक नसतानादेखील 'आर.के.'नी त्यांचा कॉमन मॅन काढून प्रेक्षकांची दाद मिळवली. मला खूप वाईट वाटलं. ज्याने ब्रशवर अनेक वर्ष अधिराज्य गाजवलं त्याला थरथरत्या हाताने व्हिलचेअरवर बसून ब्रश गिरवायला लागणे मला वेदना देऊन गेले. आज अनेक वर्ष हा अनकॉमन मॅन अर्धांगवायूने ग्रस्त आहे. पण ब्रश? तो अजूनही तितकाच ताजा अन् आमच्यासारख्या कॉमनमॅनची दाद घेणारा.

बाळासाहेब ठाकरे अन् आर. के. लक्ष्मण यांचा रोमहर्षक प्रवास एका खास मुलाखतीद्वारे ऑडियो व्हिज्युअल दाखवण्यात आला. या मुलाखतीने पहिल्या दिवसाची सांगता झाली. रंगमंदिरात उभे रहाण्यासदुद्धा जागा नव्हती. मात्र या सगळ्या व्यंगचित्रकारांत एकच महिला व्यंगचित्रकार होती! जगातले सगळे विनोद स्त्रियांवर असतात असं म्हणतात. पण खुद्द व्यंगचित्रकार एकच महिला. रंगमंदिराने वस्तुस्थितीचे असेही एक 'व्यंगचित्र' पाहिले!

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता 'व्यंगचित्रकारांचे जग' हा परिसंवाद होता. सुधीर गाडगीळ यांनी प्रशांत कुळकर्णी, 'चिंटू'वाले चारुहास पंडित यांच्याशी संवाद साधला. दुपारच्या सत्रात 'व्यंगचित्रे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य' या विषयावर परिसंवाद होता. अरणकल्ले, शि. द. फडणीस, विवेक मेहेत्रे यात सहभागी होते. दोन्ही सत्रे अभ्यासपूर्ण आणि लाजवाब होती. व्यंगचित्रकार विवेक मेहेत्रे हे उत्कृष्ट वक्तेही आहेत. ओघवत्या आणि प्रभावी शैलीने त्यांनी परिसंवाद काबीज केला.

सायंकाळच्या सत्रात तर व्यंगचित्रांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यात तरी किती परी, किती तऱ्हा! शब्दविरहीत व्यंगचित्र, एका बिंदूपासून सुरू करून आकारलेले व्यंगचित्र, एकाच क्रमांकाच्या ब्रशने अनेक तऱ्हेच्या रेषा काढून केलेले व्यंगचित्र, चित्र न काढता सूचक शब्दाने प्रकट होणारे व्यंगचित्र... अशा अनेक गमतीजमती प्रत्यक्ष अनुभवता आल्या रसिकांना खळखळून हसवितांना या चित्रांनी विचार करावयास भाग पाडले.

अजूनही समाजात व्यंगचित्राबद्दल पुरेशी साक्षरता आलेली नाही. व्यंगचित्रात नेमके काय पाहावे हे समजले पाहिजे. व्यंगचित्र हे रेषेच्या माध्यमातून बोलत असते. रेषा ही व्यंगचित्राची भाषा आहे. ती समजून घेणाराही रसिक हवा.

चांगला व्यंगचित्रकार होण्यास लागणारा एक गुण म्हणजे वात्रटपणा, खट्याळपणा. तसंच निरीक्षण करण्याची शक्ती, चित्रातली रेषा वळविण्याची ताकद, चित्र काढण्याचे कौशल्य आणि सामान्य घटनेतील विसंगतीतून निर्माण होणारी हास्यजनकता समजण्याची अक्कल व्यंगचित्रकारात असलीच पाहिजे.

याचे गमतीगमतीत धडे देणारे हे संमेलन अनेक दिग्गज व्यंगचित्रकारांच्या उपस्थितीत छान रंगले.

मला तर अलीबाबाच्या गुहेत गेल्याचा फील आला. टॉम अँड जेरीमधल्या जेरी उंदराला चीझ मिळाल्यावर जसा आनंद होतो तसंच मला काहीसं माझं झालं.

मला माझ्या व्यंगचित्रातील उणीवा उमजू लागल्या हा या संमेलनाचा मोठ्ठा फायदा झाला.

आणखी एक आवडलेली गोष्ट तुम्हाला म्हणून सांगतो. छातीवर 'व्यंगचित्रकार प्रदीप कोठारे' हा बॅज लावून संमेलनात मिरवताना आतून आतून गुदगुल्या होत होत्या हो. असो.

या संमेलनाचे आणि प्रदर्शनाचे संयोजक श्री. कैलास भिंगारे यांना खरोखरच दंडवत. व्यंगचित्रकारांचे एक प्रचंड जग आहे आणि त्यात मराठी माणसांचा भरणा आहे. त्यातली एक भाग बनून जबाबदारीने तुम्हाला मी नित्य भेटत राहीन.

या संमेलनाची तयारी म्हणून मी 'एक व्यंगचित्र' सतत जवळ बाळगत होतो. ते म्हणजे सौ. सुरेखा!

लेखांक २

# मनातलं

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

फेब्रुवारी महिना! वेगळंच वैशिष्ट्य या महिन्याला लाभलेलं आहे. कधी अठ्ठावीस दिवस तर; लीपवर्षात एकोणतीस दिवस. हा महिना परीक्षार्थींना भितीची हुडहुडी भरवणारा तर हुषार विद्यार्थ्यांचं डोकं पुस्तकात अधिकच खुपसवणारा. शाळकरी मुलांना महिन्याच्या शेवटच्या दिवसाची अर्धी सुट्टी लवकर देणारा तर; पानगळ ऐन भरात आणणारा. कडाक्याच्या थंडीचं ऊबदार थंडीत रूपांतर करणारा तर; वसंत ऋतुची चाहुल अंगणापर्यंत पोहोचल्याची खबर देणारा.

असंच आणखीन् एक जबरदस्त वैशिष्ट्य या महिन्याला चिकटलंय- ते म्हणजे 'व्हॅलनटाईन डे'. पूर्वी फक्त पाश्चात्यांपुरतं मर्यादित असलेलं या दिवसाचं वेगळेपण आता आपल्यालासुद्धा आकर्षित करतंय.

'व्हॅलनटाईन डे'चं महत्त्व मैत्रीच्या संदर्भात.मैत्री नेहमीच माणसाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. अगदी लहानपणापासून 'हा माझा मित्र आहे' किंवा 'ही माझी मैत्रीण आहे' हे खूप आनंदानं म्हटलं जातं. मैत्रीची जाणीव तेव्हापासूनच मनातली एक ठराविक जागा व्यापून बसते नी कायम मनाचा तो कोपरा उजळून टाकते.

आपल्या मनातलं हक्कानं सगळं बोलावं ते मित्रमैत्रिणीकडेच. आपलं लहानपणीचं विश्व चिमुकलं असतं. त्या विश्वातल्या त्या गप्पा, चिमणीच्या दातांनी तोडलेली लिमलेटची गोळी किंवा गाभुळलेली चिंच, कैरीचा काप, नी ओली बडीशेप, कधी खोबऱ्याचा तुकडा तर कधी शेंगदाणे- हे सगळंच विलक्षण आनंद देणारं नी नंतर निरंतर आठवणीत राहणारं.

लहानपणीचा हा वसा मोठं झाल्यावरही चालूच राहतो. लहानपणी खेळलेली भातुकली मोठं झाल्यानंतर खऱ्या संसाराचं रूप घेते आणि जीवनातल्या सहचराच्या रूपात आपण मैत्री शोधतो.

कधीकधी दोन बहिणींमध्ये किंवा दोन भावांमध्येही चांगली घट्ट मैत्री असते. तर कधी आई-मुलगी हे नातं मुलगी मोठी होत असतांना मैत्रीत कसं बदलतं हे कळत नाही. तीच गोष्ट वडील आणि मुलगा या नात्याची. सोळा वर्षांचा मुलगा हा वडिलांचा मित्र बनतो. हे सर्व एकमेकांचे व्हॅलनटाईन असू शकतात. माणसाच्या आयुष्यातला कोणताही नातेवाईक किंवा सहवासात येणारी कोणतीही व्यक्ती एकमेकांचे व्हॅलनटाईन असू शकतात.

मैत्री म्हणजे जीवनातला सुंदर झरा. सतत झुळझुळ वाहणारा. कधी मैत्रीच्या शीतल वाऱ्यासारख्या मोरपिसानं मन हळुवार बनतं. तर कधी मैत्री घेते भन्नाट वाऱ्याचं रूप. अतिशय वेगानं जाणाऱ्या मोटारीत कधी बसलायत तुम्ही? पुष्कळसा रिकामा रस्ता, वाऱ्याच्या वेगानं धावणारी मोटार नी त्याचबरोबर कुठंतरी झाडावर आदळू ही मनातली भीती आणि तरीही वेग कमी करायला हवा हा विचारही मनाला रूचत नाही. हा प्रवास शब्दात न मावणारा, पण मनाला खूप भावणारा. तो प्रत्यक्षच अनुभवायला हवा, तरच त्यातली गंमत आनंद देते. अशा मैत्रीला एखादं गुलाबाचं फूल देऊन किंवा छोटीसी भेटवस्तू अथवा शुभेच्छापत्र देऊन सलाम करणं ही सर्व संकल्पनाच खूप गोड आहे. आपल्या हक्काच्या मैत्रीची जाणीव मनाला सुखवून जाते. या गुलाबाच्या फुलात किंवा त्या भेटवस्तूत असतं निखळ प्रेम, कृतज्ञता आणि 'मी तुझ्या समवेत सतत आहे. हक्कानं कधीही हाक मार, मी त्वरीत मदतीला धावून येईन' हा अलिखित पण चिरंतन संदेश जो मनानंच ओळखायचा, विचारांमध्ये सतत घोळवायचा नी हृदयसंपुटात अलगद जपून ठेवायचा. मैत्रीत असतो एक विश्वास- कधीही न संपणारा भरवंशाचा निःश्वास. मैत्रीत असतो हक्क नी नसते अरेरावी. सुहृदाचं मन जपणारी शक्ती त्यात असते तशी त्याचा उदास किंवा व्याकूळ नूर आपल्या शब्दांनी पार पालटून टाकून त्याला हसरं करण्याची जादूही त्यातच असते.

'व्हॅलनटाईन डे' साजरा करण्याची संकल्पना पाश्चात्य असली तरीही मैत्रीची भावना सर्वच माणसांमध्ये सारख्याच प्रमाणात असते. मैत्रीला नसते भाषा. ती तर निराशेला पळवून लावणारी आशा. मैत्रीला नसतो धर्म. ते असतं सर्वांचंच सुंदर कर्म. मैत्री कोणत्याही एका देशाची जहागीर नसते तर सगळ्यांचीच हक्काची मालकी असते. एकाच गटातले सर्वच मालक. तिथं कुणीच नोकर नसतो. तरीही कामाची आज्ञा देऊ शकणारा हक्क प्रत्येकालाच असतो. मैत्रीच्या जगात वर्णभेद, वंशभेद किंवा लिंगभेद नसतो. ते एक सुंदर निराकार, निरामय विश्व असतं. प्रेम माया, जिव्हाळा, कौतुक, एकमेकाबद्दलचा आदर असे त्या विश्वाचे कंगोरे असतात.

तर मग व्हॅलनटाईनचा संबंध फक्त स्त्री-पुरुष संबंधांच्या बाबतीत असतो असं गृहीत धरून स्वतःला धर्ममार्तंड समजणारे काही लोक मैत्रीचं निष्पाप रूप कलंकित करण्याचा प्रयत्न का करतात?कोण जाणे. कुणाही दोन व्यक्तींमधील निखळ, निकोप मैत्री मुळी अस्तित्वातच नसते असं ते का मानतात? कदाचित् या जगामधले फक्त वाईट अनुभव त्यांना येत असावेत किंवा त्यांच्याकडे कोणत्याही गोष्टीकडे अलिप्ततेनं बघणारा व्यापक दृष्टीकोन नसावा. मुळात त्यांच्या विचारांचा गाभाच सकस नसावा. म्हणून ते 'व्हॅलनटाईन डे' साजरा करण्याच्या विरोधात टोकाची वाईट भूमिका घेतात. अर्थात 'व्हॅलनटाईन डे'ला ओंगळ शृंगाराचं रूप देणारेसुद्धा लोक असतात. पण ते केवळ मूठभर. 'व्हॅलनटाईन डे'च्या निमित्तानं फुलवाले, शुभेच्छापत्र विक्रेते, तसंच अनेक छोट्यामोठ्या भेटींचा या निमित्ताने जाहीरपणे व्यापार करणारे नी अशा गोष्टी निर्माण करणारे अशा कित्येकांना रोजगार मिळतो.

पण कोणत्याही गोष्टीचा अतिरेक सारासार विवेकबुद्धीला गहाण ठेवणारा ठरतो. तसंच 'व्हॅलनटाईन डे'च्या बाबतीत हल्ली झालंय. प्रेमानं दिल्या जाणाऱ्या वस्तू किंवा शुभेच्छापत्रांची किंमत पैशांमध्ये मोजली जातेय. दुसऱ्यापेक्षा माझी भेटवस्तू किती महाग आहे किंवा शुभेच्छापत्र किती मोठं आहे हे आता तपासलं जातंय नी भेट घेणाऱ्याकडून ते तशाच प्रकारानं मोजलं जातंय. या सगळ्या प्रकारात भेटीमागचा जिव्हाळा, माया, आदर बाजूला पडतो नी उरतो केवळ हौसेचा बाजार. स्वतः दिलेली भेटवस्तू किंवा आपल्याला मिळालेली वस्तू फक्त 'ठीक आहे' या सदरात किंवा 'अगदीच सामान्य' या सदरात मोडतेय याची नुसती शंका जरी देणाऱ्या-घेणाऱ्याच्या मनात डोकावली तरी ती भेट नगण्य ठरते. जरी त्यामागची भावना अमूल्य असली तरीही. आणि मग या देण्याघेण्याच्या सोहळ्याला खट्टू मनाचं गालबोट लागतंच. अर्थातच हेच लोक उगीचच हे सदर ठरवत असतात.

यात भर टाकतात ते सोशल नेटवर्किंग साईटस्वरचे स्क्रॅप्स किंवा एकमेकांना आपल्याला किती किंमती वस्तू मिळाल्यात अथवा आपण किती किंमती वस्तू आपल्या व्हॅलनटाईनला दिलीय त्याची चर्चा. परिस्थितीनं मध्यमवर्गात मोडणारी मुलं हे सगळं वाचून स्वतःच्या सद्यपरिस्थितीवर नाराज होतात. प्रत्येक बाब पैशांनी तोलणाऱ्या या जगात आपले आईवडील कसे गरीब आहेत नी त्यांना आपल्याला जास्त पॉकेटमनी देणं जमत नाही या वस्तुस्थितीवर ही मुलं शब्दांचे आसूड घरात फिरवत राहतात आणि एका हृद्य, कोमल, निष्पाप सोहळ्यावर अत्यंत मोठ्या रागाचा अंगार टाकतात.

खरं तर हल्लीच्या नवीन पिढीत हा मैत्री नामक प्रकार खूप विचित्र परिस्थितीत असतो. आज माझ्याबरोबर जो चांगलं वागेल, माझ्याबद्दल चांगलं बोलेल तो माझा मित्र किंवा मैत्रीण ही त्यांची मित्र किंवा मैत्रीण या शब्दाची व्याख्या आहे. खरंतर या व्याख्येची सुरुवात मी सतरा अठरा वर्षांपूर्वी माझ्या ऑफीसमध्ये पाहिली होती. त्या नवीन बॅचची मैत्रीची व्याख्या होती- जो किंवा जी आज माझ्याबरोबर लंच अवरमध्ये डबा खाईल किंवा हॉटेलमध्ये येईल ती व्यक्ती म्हणजे मित्र किंवा मैत्रीण. तेव्हा आजच्या एवढया व्यापक प्रमाणात ही व्याख्या किंवा रूप फैलावेल असं मला कधीच वाटलं नव्हतं. आमच्या मागच्या पिढीनं आयुष्याच्या अंतापर्यंत वर्षानुवर्षे तीच मित्रमंडळी सांभाळली नी आमची पिढीसुद्धा ही गोष्ट अगत्यानं सांभाळतेय. मग ही तेव्हाची नवीन पिढी नी परवापरवाची नवीन पिढी मैत्रीचा पाया एवढा ठिसूळ का करतेय? फक्त मित्र / मैत्रीणींची संख्या का वाढवतेय? नी त्यांच्या त्या मैत्रीला मैत्री तरी का म्हणायचं? केवळ ओळख ही संज्ञा पुरेशी ठरावी. पूर्वीच्या काळीही प्रत्येकाला खूप मित्रमैत्रिणी असत. वडिलांच्या मित्रांना आवर्जून काका नी आईच्या मैत्रिणींना मावशी म्हटलं जाई. त्यांना नी त्यांच्या घरचे सगळे नी क्वचित त्यांचे भाऊबहीण इत्यादी सर्वांना आम्ही ओळखत असू. त्यांच्या मुलांची आमच्या पिढीबरोबर दाट मैत्री असायची. अजूनही ती मैत्री तशीच आहे. त्या काकी किंवा मावशी त्यांच्या घरून निघताना आवर्जून मला आणि आईला गजरे, फुलं देत असत. नी ते माळल्यानंतरच निघू देत असत. निघण्यापूर्वी त्या फुलांचे वास घेत. नी म्हणत, ''असं केलं तर तुम्ही पुन्हा लवकरच आमच्या भेटीला याल.'' आता ही संकल्पनाच लोकांना टाकाऊ वाटते. आजकाल फारसं कुणी कुणाकडे जात नाही.

जग बदललंय. हळुहळू अशी मैत्री फक्त 'व्हॅलनटाईन डे' पुरतीच दिसण्याचा दाट संभव नाकारता येत नाही.

## परीक्षेतील सुयश

**बीएस् इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (जॉर्जिया टेक्नीकल युनिव्हर्सिटी)**

श्री. करण सलील मधुकर तळपदे

## चुकीची दुरुस्ती

❁ संजना कोठारे यांच्या विस्तारीत संपादकीयात वृत्त देताना सौ. पूजा अजिंक्य यांच्या निवेदनाचा उल्लेख आहे. हे निवेदन पूजा अजिंक्यांबरोबरीने श्रीमती स्वाती प्रवीण राणे यांचेही होते. अनावधानाने उल्लेख राहून गेला.

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणास देणग्या

❁ श्री. मुकुंद सदाशिव गोरक्षकर यांजकडून प्रभुतरुणास भेट रु.१५००/-

❁ श्री. भौतिक विनय राणे (यु. के.) यांजकडून त्यांची आजी कै.क्षमा यशवंत राणे आणि आजोबा कै. यशवंतराव वामनराव राणे यांच्या स्मरणार्थ रु. १००१/-

❁ श्रीमती कस्तुर रवींद्र तळपदे यांजकडून रु. १००१/-

❁ सौ. प्रमिला मधुकर तळपदे यांजकडून नातू करण सलील तळपदे पदवीधर झाल्याप्रीत्यर्थ रु. ५००/-

❁ आजीव सदस्यत्व श्री. राज गजानन धराधर रु. ३५०/-

❁ सौ. प्रतिमा आणि श्री. विनोद प्रधान यांजकडून त्यांची कन्या सौ. स्वप्ना हिच्या विवाहाच्या रौप्य महोत्सवानिमित्त रु. २५०/-

*

## पाठारे प्रभु महिला समाज

समाजाचा ९८वा वार्षिक बक्षिस समारंभ २४ फेब्रुवारी २०१२ रोजी सायंकाळी ४ वाजता खार येथील पा. प्र. हा. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्रात होणार आहे. प्रमुख पाहुण्या आहेत ॲड. सौ. नीलिमा कानेटकर. यावेळी खास दिले जाणारे पुरस्कार पुढीलप्रमाणे:-

❁ कै. चित्तरंजन चंद्रकांत धुरंधर व कै. चंपुबाई आनंदराव धराधर स्म. समाजसेवा रौप्यपदक:- सौ. स्निग्धा उल्हास कोठारे यांना.

❁ कै. प्रमिला मोतिराम जयकर स्म. रौप्यपदक

❁ कै. श्री. दत्तकुमार धराधर स्म. गृहिणी रौप्यपदक :- सौ. आशा जयबाळ विजयकर यांना

❁ कै. सुदक्षिणा दिलीप कोठारे स्म. सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी रौप्यपदक:- डॉ. सौ. रश्मी यतीन व्यवहारकर यांना

❁ कै. संपदा सुमील कोठारे स्म. :- विद्यार्थिनीस पदक

❁ कै. नीरजा नागेंद्र तळपदे स्म. स्मृतिचिन्ह:- सौ. दीपश्री सुदीप कोठारे यांना.


// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*
*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन,
स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८


## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

२६-१०-१२ कु. मायरा (जिया) भूषण प्रवीण राणे

### नांदा सौख्यभरे

०९-१२-१२ कु. कादंबरी कैलास कोठारे, श्री. करणकुमार (आं. ज्ञातीय)
१६-१२-१२ कु. रुपाली सुभाष विजयकर, श्री. हेमंत प्रकाश वहाळकर (आं. ज्ञातीय)
१७-१२-१२ श्री. भूषण जयपाल नवलकर, कु. एकता काजी (आं. ज्ञातीय)
१९-१२-१२ श्री. रोहन जयपाल नवलकर, कु. सोनल उदय तळपदे
२२-१२-१२ श्री. सलील दीपक नायक, कु. अस्मिता दिलीप साळवी (आं. ज्ञातीय)
२६-१२-१२ कु. प्रज्ञा प्रफुल्ल नवलकर, श्री. आशिष विनायक शिरसाट (आं. ज्ञातीय)

### विवाह रौप्य महोत्सव

२०-०२-१३ श्री. तेज प्रताप वेलकर
कु. दीपाली (स्वप्ना) विनोद प्रधान

### विवाह माणिक महोत्सव

श्री. दीपक माधव धैर्यवान
कु. नीलन पुष्पराज नवलकर

श्री. कुमार जयंत गोरक्षकर
कु. यदुला केशव धैर्यवान

श्री. दिलीप नारायण व्यवहारकर
कु. साधना केशव धैर्यवान

### मरण

०८-०१-१३ श्रीमती विजया सूर्यकांत तळपदे वय ८३ अंधेरी


**MAHABALESHWAR**
*COME HERE TO EXPERIENCE NATURE AT ITS BEST WITH JASMINE COTTAGE*




*THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS . IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST ALL THE ROOMS HAVE SERENE ENVIRONMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUESTS CAN SIT AND ENJOY THE PLEASANT BEAUTY OF THE NATURE*

**FACILITIES:**
- Attached bath
- Hot & Cold Running water
- Television with Satellite Connection
- Car Parking
- Large open area for playing outdoor games

**Location:**
It is located near the market in Mahabaleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabaleshwar.

***For Booking Contact:***
***Velkars 9930172689 9220451465***


हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67